Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। रविवार, दि. १७ मे २०२६ । वर्ष १ । अंक ४२ । पाने २।
DIGITAL EDITION

सीए आगीवाल व्यावसायिक क्षेत्रात मानाच्या पदांवर नियुक्ती
(पान २ वर)



## Selected

### गुरु-शिष्याच्या नावाला काळीमा!

**जळगाव:** धरणगाव तालुक्यात शिक्षण क्षेत्राला हादरवून टाकणारी आणि गुरु-शिष्याच्या पवित्र नात्याला काळीमा फासणारी अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. जिल्हा परिषद शाळेतील एका शिक्षकाने चौथीच्या वर्गात शिकणाऱ्या अवघ्या ९ वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी धरणगाव पोलिसांनी तातडीने कारवाई करत संशयित शिक्षक नंदलाल नारायण मराठे याला अटक केली आहे. जून २०२४ ते एप्रिल २०२६ या कालावधीत पीडित बालिकेचा छळ करत होता. शाळेच्या वेळेत तो मुलीला वर्गात एकटे बोलवून मोबाईलवर अश्लील व्हिडिओ दाखवत तिच्यावर अत्याचार करत होता. हा प्रकार कोणालाही सांगितल्यास “तुझ्या आई-वडिलांना मारून टाकीन,” अशी धमकी देत आरोपीने चिमुरडीला दहशतीखाली ठेवले होते.

## महसूलमंत्री बावनकुळे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना थेट आदेश

# कर्ज नाकारणाऱ्या बँकांवर गुन्हे दाखल होणार!

## कृषी केंद्रांच्या लिंकिंग प्रकारावरही महसूलमंत्री बावनकुळे यांचे कारवाईचे संकेत

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई । : राज्यातील शेतकरी आधीच नैसर्गिक संकटे, गारपीट आणि आर्थिक अडचणींमुळे त्रस्त असताना आता पीककर्जासाठीही त्यांना बँकांच्या दारात हेलपाटे मारावे लागत आहेत. अनेक बँका शेतकऱ्यांना कर्ज देण्यास टाळाटाळ करत असल्याच्या तक्रारी वाढत असतानाच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कठोर भूमिका घेतली आहे.**

शेतकऱ्यांना विनाकारण कर्ज नाकारणाऱ्या बँकांवर थेट गुन्हे दाखल करण्याचे आदेश त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. अमरावती येथे महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली खरीप हंगाम आढावा बैठक पार पडली. या बैठकीत बी-बियाणे, रासायनिक खते, कृषी साहित्य आणि शेतकऱ्यांना उपलब्ध होणाऱ्या सुविधांचा आढावा घेण्यात आला. यावेळी बावनकुळे यांनी सांगितले की, राज्य सरकारकडून अमरावती जिल्ह्यासाठी आवश्यक असलेले बी-बियाणे आणि खतांचा पुरवठा करण्यात येणार असून सेंद्रिय खतांच्या वापरावर अधिक भर दिला जाणार आहे.“शेतकऱ्यांना कर्ज न देणाऱ्या बँका चालणार नाहीत” बैठकीत बोलताना बावनकुळे यांनी खासगी आणि राष्ट्रीयीकृत बँकांवर नाराजी व्यक्त केली. “ज्या बँका अमरावतीतील पाणी, रस्ते आणि वीज सुविधा वापरतात, पण शेतकऱ्यांना कर्ज देण्यास नकार देतात, अशा बँकांवर थेट कारवाई करा,” असे स्पष्ट आदेश त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिल्याचे सांगितले. पीककर्ज वितरणात टाळाटाळ करणाऱ्या बँकांविरोधात कठोर भूमिका घेतल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.



### जरांगे पाटलांच्या आंदोलनावर स्पष्ट भूमिका

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या घोषणेवर प्रतिक्रिया देताना बावनकुळे म्हणाले की, ज्या नोंदींमध्ये ‘कुणबी’ अशी स्पष्ट नोंद आहे, त्यांना प्रमाणपत्र दिले जाईल. मात्र कोणताही पुरावा नसताना किंवा नोंदींमध्ये खोडतोड करून प्रमाणपत्र मागणाऱ्यांना ते मिळणार नाही. “कोणत्याही नागरिकावर अन्याय होणार नाही, पण नियमांनुसारच प्रमाणपत्र दिले जाईल,” असे त्यांनी स्पष्ट केले.



दर्यापूर भागातील काही कृषी केंद्रांकडून शेतकऱ्यांना विशिष्ट उत्पादने खरेदीसाठी दबाव टाकला जात असल्याच्या तक्रारींवरही बावनकुळे यांनी संताप व्यक्त केला. “लिंकिंग करून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कृषी केंद्रांवर कारवाई केली जाईल,” असा इशाराही त्यांनी दिला.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# साक्रीत दुहेरी हत्याकांडाने खळबळ

## भोंदू भगत पोलिसांच्या ताब्यात

**जन सम्राट टाईम्स**



**धुळे | प्रतिनिधी:** धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यात दुहेरी हत्याकांडाची धक्कादायक घटना उघडकीस आली असून, तरुण आणि विवाहित तरुणीचे मृतदेह वेगवेगळ्या ठिकाणी आढळून आल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या घटनेमागे बुवाबाजीचा संबंध असल्याचा संशय व्यक्त केला जात असून, निजामपूर पोलिसांनी संशयित भोंदू भगत योगेश खैरनार याला ताब्यात घेतले आहे. मृतांमध्ये जयश्री रजनीकांत काकुसते (वय २५, रा. कासारे, ता. साक्री) आणि अक्षय सोनवणे (वय २८, रा. भाडणे, ता. साक्री) यांचा समावेश आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सकाळच्या सुमारास वरदाने टेंबे फाट्याजवळ जयश्री काकुसते हिचा मृतदेह दुचाकीसह संशयास्पद अवस्थेत आढळून आला. तर दुसरीकडे अक्षय सोनवणे याचा मृतदेह उभरांडी-जैताणे शिवारातील गौशाळेच्या मठाजवळ पुरलेल्या अवस्थेत आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. दोन्ही घटनांची माहिती मिळताच निजामपूर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतले आणि शवविच्छेदनासाठी पाठवले. दरम्यान, भोंदू भगत योगेश खैरनार यांच्या मठात झालेल्या वादातून हे हत्याकांड घडल्याची चर्चा तालुक्यात रंगली आहे. विशेष म्हणजे, मृत विवाहितेच्या मृतदेहाजवळ संशयित भोंदू भगताचा रुमाल आढळून आल्याने पोलिसांचा संशय अधिक बळावला आहे. त्यानंतर पोलिसांनी योगेश खैरनार याला ताब्यात घेत चौकशी सुरू केली आहे.

### २४ तासांत चार हत्यांनी धुळे हादरले

यापूर्वी शिरपूर येथे घडलेल्या दुहेरी हत्याकांडानंतर आता साक्रीतील या घटनेमुळे अवघ्या २४ तासांत चार जणांचा बळी गेल्याने धुळे जिल्हा हादरला असून, कायदा व सुव्यवस्थेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पोलिसांकडून अधिकृत तपास पूर्ण होईपर्यंत नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पुन्हा लॉकडाऊन लागणार: किरेन रिजिजू यांनी दिले स्पष्टीकरण

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली | प्रतिनिधी:** जागतिक स्तरावर सुरू असलेल्या युद्धजन्य तणावामुळे अनेक देशांमध्ये कडक निर्बंध आणि लॉकडाऊनसदृश्य उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. त्यामुळे भारतातही पुन्हा लॉकडाऊन लागू होणार का? असा प्रश्न नागरिकांच्या मनात निर्माण झाला आहे. कोरोना काळातील लॉकडाऊनमुळे सर्वसामान्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला होता. त्यामुळे लॉकडाऊनचा विषय निघताच नागरिकांमध्ये चिंता वाढताना दिसत आहे. दरम्यान, या चर्चांवर आता केंद्र सरकारकडून महत्त्वाचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी भारतातील परिस्थितीबाबत भाष्य करत लॉकडाऊनच्या चर्चांना पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला आहे. भारतामध्ये लॉकडाऊन लागणार का? या प्रश्नावर प्रतिक्रिया देताना किरेन रिजिजू म्हणाले की, “सध्या भारतातील परिस्थिती इतकी



गंभीर नाही की लॉकडाऊनसारखी कठोर पावले उचलावी लागतील. मात्र, भविष्यातील कोणत्याही वाईट परिस्थितीसाठी सतर्क राहणे आवश्यक आहे.” रिजिजू यांच्या या वक्तव्यामुळे केंद्र सरकार सध्या तरी देशात लॉकडाऊन लावण्याच्या विचारात नसल्याचे स्पष्ट झाले आहे. किरण रिजिजू यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी गेल्या अनेक वर्षांपासून देशांतर्गत उत्पादन वाढवण्यावर भर देत आहेत. परदेशी आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी केंद्र सरकार विविध उपाययोजना राबवत आहे. “भारत हा अजूनही जगातील दुसऱ्या क्रमांकाचा तेल आयातदार देश आहे. त्यामुळे जागतिक संकटाच्या काळात ऊर्जा बचत आणि स्वयंपूर्णतेकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे,” असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, केंद्र सरकारने नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि अधिकृत माहितीलाच प्राधान्य देण्याचे आवाहन केले आहे. सध्यातरी भारतात लॉकडाऊनची शक्यता नसली, तरी जागतिक परिस्थिती पाहता सतर्कता आवश्यक असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

### “भारत गंभीर संकटात नाही”

अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना इंधन बचतीचे आवाहन केले होते. तसेच अनावश्यक खर्च टाळण्याचा सल्लाही दिला होता. त्याच पार्श्वभूमीवर बोलताना रिजिजू यांनी एका वृत्तवाहिनीला सांगितले की, “भारतामध्ये सध्या गंभीर संकटाची परिस्थिती नाही. मात्र पश्चिम आशियातील तणावामुळे जागतिक ऊर्जा संकट निर्माण झाले आहे. त्याचा परिणाम व्यापार मार्गांवरही होत आहे.

# जळगावकरांना उकाड्यातून दिलासा!

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी:** गेल्या काही दिवसांपासून तीव्र उष्णतेच्या लाटेने होरपळून निघालेल्या जळगावकरांना अखेर काहीसा दिलासा मिळाला आहे. जिल्ह्यात तापमानाचा पारा सलग ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे जात असल्याने नागरिक हैराण झाले होते. मात्र, हवामानात अचानक बदल झाल्याने गेल्या २४ तासांत तापमानात तब्बल ३ अंश सेल्सिअसची घट नोंदविण्यात आली आहे.

१५ मे रोजी जळगाव शहराचे कमाल तापमान ४२.४ अंश सेल्सिअस इतके नोंदविण्यात आले. त्याआधी १४ मे रोजी तापमानाचा पारा ४५.३ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला होता. अवघ्या एका दिवसात



झालेल्या या लक्षणीय घसरणीमुळे नागरिकांना कडक उन्हापासून काही प्रमाणात आराम मिळाला आहे. मात्र, तापमानात घट झाली असली तरी उकाड्याची तीव्रता कायम असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. उष्णतेच्या लाटेमुळे नागरिक त्रस्त गेल्या काही दिवसांपासून जळगाव शहरासह जिल्ह्यात उष्णतेची तीव्र लाट होती. दुपारच्या वेळेत रस्ते ओस पडत होते, तर घराबाहेर पडणेही नागरिकांसाठी कठीण झाले होते. विशेष म्हणजे, रात्रीच्या तापमानातही वाढ झाल्याने नागरिकांना उकाड्याचा मोठा त्रास सहन करावा लागत होता.

मात्र, हवामानात अचानक बदल झाल्याने गेल्या २४ तासांत तापमानात तब्बल ३ अंश सेल्सिअसची घट नोंदविण्यात आली आहे. १५ मे रोजी जळगाव शहराचे कमाल तापमान ४२.४ अंश सेल्सिअस इतके नोंदविण्यात आले. पुढील काही दिवस कसे राहणार हवामान? हवामान विभागाच्या अंदाजानुसार, जळगावकरांना पुढील काही दिवसही काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. २० मेपर्यंत तापमान ४२ ते ४३ अंश सेल्सिअसदरम्यान राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तसेच जिल्ह्यात काही भागांत सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता असल्याने उष्णतेची तीव्रता आणखी कमी होऊ शकते. त्यामुळे पुढील काही दिवस नागरिकांना प्रखर उन्हापासून थोडाफार दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ऑनलाइन स्वगणनेला महाराष्ट्रात अल्प प्रतिसाद




**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी :** यंदा प्रथमच जनगणना मोहिमेअंतर्गत राबविण्यात आलेल्या ऑनलाइन स्वगणना उपक्रमाला महाराष्ट्रात अपेक्षेपेक्षा कमी प्रतिसाद मिळाल्याचे चित्र समोर आले आहे. राज्यातील केवळ १२ लाख ६० हजार ९५० कुटुंबांनी ऑनलाइन स्वगणना प्रक्रिया सुरू केली असून, त्यापैकी ११ लाख १४ हजार २७७ कुटुंबांनी ही प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केली आहे.राज्यात पुणे जिल्हा स्वगणनेत आघाडीवर असून, येथे सर्वाधिक १ लाख ५३ हजार कुटुंबांनी ऑनलाइन नोंदणी पूर्ण केली आहे. त्याखालोखाल मुंबई उपनगरात १ लाख २१ हजार तर ठाणे जिल्ह्यात १ लाख १६ हजार कुटुंबांनी स्वगणना केली आहे. लोकसंख्येच्या तुलनेत प्रतिसाद कमी पुणे, ठाणे आणि मुंबई उपनगर या शहरी जिल्ह्यांमध्ये स्वगणनेची संख्या तुलनेने अधिक असली तरी संबंधित जिल्ह्यांच्या लोकसंख्येच्या तुलनेत हा प्रतिसाद अत्यंत कमी असल्याचे दिसून आले आहे. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात २.४४ कोटींहून अधिक कुटुंबे होती. त्यामध्ये ग्रामीण भागातील सुमारे १.३२ कोटी तर शहरी भागातील सुमारे १.१२ कोटी कुटुंबांचा समावेश होता. त्यावेळी राज्याची एकूण लोकसंख्या ११.२४ कोटी इतकी नोंदविण्यात आली होती. ज्या कुटुंबांनी ऑनलाइन स्वगणना प्रक्रिया पूर्ण केली आहे, त्यांनी घरगणनेच्या वेळी गणनाकर्मचाऱ्यांना “H” अक्षराने सुरू होणारा ११ अंकी ‘स्वगणना ओळख क्रमांक’ (SEID) देणे आवश्यक आहे. यामुळे माहिती संकलन प्रक्रिया अधिक सुलभ आणि अचूक होण्यास मदत होणार आहे. १६ मेपासून घरभेटी सुरू ज्या कुटुंबांनी ऑनलाइन स्वगणनेचा लाभ घेतला नाही किंवा प्रक्रिया पूर्ण करू शकली नाहीत, त्यांच्याकडे गणनाकर्मचारी १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत प्रत्यक्ष घरभेटी देऊन माहिती संकलन करणार आहेत. दरम्यान, डिजिटल माध्यमातून जनगणना प्रक्रिया अधिक वेगवान आणि सुलभ करण्याचा प्रयत्न असला तरी ग्रामीण भागातील इंटरनेट सुविधा, तांत्रिक अडचणी आणि जागरूकतेचा अभाव यामुळे ऑनलाइन स्वगणनेला मर्यादित प्रतिसाद मिळाल्याचे बोलले जात आहे.

### काही जिल्ह्यांतील स्वगणनेची आकडेवारी

- आहिल्यानगर – २४,०३६
- अकोला – १५,६९२
- अमरावती – ३६,२२३
- बीड – २०,८६५
- भंडारा – ७,७७७
- बुलढाणा – २१,७११
- चंद्रपूर – १०,८९३
- छत्रपती संभाजीनगर – ३२,२४२
- मुंबई शहर – ६१,२९५
- कोल्हापूर – २३,५२४
- नागपूर – ३७,५३४
- नाशिक – ५२,६६७
- सोलापूर – ३४,३१३
- रत्नागिरी – ८,६३१
- सातारा – २६,६५४

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# वीज असूनही जळगावकर अंधारात!

## भूमिगत केबल कामातील गोंधळामुळे नागरिक त्रस्त; आ. भोळे यांचा अधिकाऱ्यांना दम

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव :** जळगाव जिल्ह्यात सध्या उन्हाचा पारा ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला असून नागरिक उकाड्याने हैराण झाले आहेत. अशा परिस्थितीत शहरात सुरू असलेल्या भूमिगत वीज वाहिन्यांच्या कामातील नियोजनशून्यतेमुळे जळगावकरांना अघोषित लोडशेडिंग आणि अंधाराचा सामना करावा लागत आहे. या गंभीर समस्येची दखल घेत आमदार सुरेश (राजूमामा) भोळे यांनी महापालिका, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) यांच्या अधिकाऱ्यांची तातडीची संयुक्त बैठक घेत अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. शहरात विविध भागांमध्ये भूमिगत विद्युत केबल टाकण्याचे काम सुरू असताना संबंधित ठेकेदारांकडून निष्काळजीपणा होत असल्याचा आरोप बैठकीत करण्यात आला. नवीन केबलची जोडणी पूर्ण होण्यापूर्वीच जुन्या स्ट्रीट लाईटच्या केबल्स कापल्या जात असल्याने अनेक रस्ते आणि कॉलनी रात्रीच्या वेळी अंधारात बुडत आहेत. विशेष म्हणजे, या कामाबाबत महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनाही कोणतीही पूर्वसूचना दिली जात नसल्याने विविध यंत्रणांमधील समन्वयाचा अभाव स्पष्टपणे समोर आला आहे. शहरात वारंवार वीज खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. महावितरणकडून प्रत्येक वेळी “तांत्रिक बिघाड” असल्याचे कारण देत वेळ मारून नेली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. स्ट्रीट लाईटचे फ्युज, वायरिंग आणि नियमित देखभालीकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांना रात्रीच्या वेळी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वाढत्या उकाड्यात वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांचा संताप अधिकच वाढला आहे. पद्मालय विश्रामगृहात झालेल्या बैठकीत आमदार सुरेश भोळे यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत इशारा दिला. “विविध विभागांमध्ये समन्वय नसल्यामुळे जळगावच्या जनतेला नाहक त्रास सहन करावा लागत आहे. ठेकेदारांनी मनमानी पद्धतीने कामे केल्यास त्यांच्यावर तात्काळ कारवाई करा. नागरिकांना अखंडित वीजपुरवठा आणि प्रकाशमान रस्ते मिळणे हा त्यांचा हक्क आहे. यात कोणतीही हलगर्जी खपवून घेतली जाणार नाही,” असा सज्जड दम त्यांनी अधिकाऱ्यांना दिला.



### नागरिकांचे लक्ष प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे

आमदार भोळे यांच्या आक्रमक भूमिकेनंतर प्रशासन आणि संबंधित यंत्रणा कितपत सक्रिय होतात, तसेच शहरातील अंधार आणि वीज समस्येवर कितपत तोडगा निघतो,या गंभीर समस्येची दखल घेत आमदार सुरेश (राजूमामा) भोळे यांनी महापालिका, महावितरण यांच्या अधिकाऱ्यांची तातडीची संयुक्त बैठक घेत अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. शहरात विविध भागांमध्ये भूमिगत विद्युत केबल टाकण्याचे काम सुरू असताना संबंधित ठेकेदारांकडून निष्काळजीपणा होत असल्याचा आरोप बैठकीत करण्यात आला.

» Selected

## आईच्या मायेने दिले जीवनदान

**पहूर | प्रतिनिधी :** आईच्या मायेपुढे कोणताही स्वार्थ टिकू शकत नाही, याची प्रचिती देणारी भावनिक घटना जामनेर तालुक्यातील पहूर येथे समोर आली आहे. मृत्यूशी झुंज देणाऱ्या आपल्या मुलाला वाचवण्यासाठी जन्मदाती आईने स्वतःची किडनी दान करून त्याला नवजीवन दिल्याने सर्वत्र या मायलेकरांच्या नात्याची चर्चा सुरू आहे. पहूर येथील कुंदन अमृत वानखेडे (वय ३१) हा मुंबई येथे आधार सेंटरमध्ये कंत्राटी कर्मचारी म्हणून कार्यरत होता. एमएस्सी ॲग्रीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील आधार सेंटरमध्ये नोकरी सुरू केली होती. मात्र काही दिवसांपासून त्याच्या चेहऱ्यावर व पायांवर सूज येऊ लागल्याने त्याने मुंबईत उपचार घेतले. तपासणीत कुंदनच्या दोन्ही किडन्या जवळपास ९० टक्के निकामी झाल्याचे निष्पन्न झाले. ही बाब समोर येताच वानखेडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. आई ठरली मुलासाठी देवदूत अशा कठीण प्रसंगी कुंदनची आई लीलाबाई वानखेडे या खंबीरपणे पुढे सरसावल्या.

# रस्त्यांसह भरीव विकासकामांना गती!

## शिवाजी रोडच्या कॉंक्रिटीकरणाचे आ. अग्रवाल यांच्या हस्ते भूमिपूजन

जन सम्राट टाईम्स

**धुळे :** शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणासह विविध विकासकामांना गती देण्यात येत असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शहराला स्मार्ट आणि सुंदर बनविण्याचा प्रयत्न सुरू आहे. शासनाच्या विविध योजनांतून कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, धुळेकरांनीही विकासकामांना सहकार्य करावे, असे आवाहन आमदार अनुपभय्या अग्रवाल यांनी केले. शहरातील पांझरा नदीकाठावरील शिवाजी महाराज रोडवरील श्री सिद्धेश्वर गणपती मंदिर ते श्री स्वामी समर्थ केंद्रापर्यंतच्या व्हाइट टॉपिंग रस्ता कॉंक्रिटीकरणाच्या कामाचे भूमिपूजन शनिवारी आमदार अनुपभय्या अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी महापौर मायादेवी परदेशी, भाजप महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, उपमहापौर



ज्योत्स्ना पाटील, भाजप गटनेत्या किरण कुलेवार, माजी महापौर तथा नगरसेविका कल्पना महाले, नगरसेवक सुनील बैसाणे, ललित आरुजा, रोहित चांदोडे, भिकन वराडे, महादेव परदेशी, प्रफुल्ल पाटील, धीरज जगताप, मयूर ठाकरे, सागर चौधरी, शहर अभियंता चंद्रकांत उगले, कनिष्ठ अभियंता प्रणव शिंदे, ठेकेदार मिलिंद मुडावदकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार अग्रवाल यांनी सांगितले की, श्री सिद्धेश्वर गणपती मंदिर ते श्री स्वामी समर्थ केंद्र, महात्मा गांधी पुतळा तसेच झाशी राणी पुतळा ते अग्रवाल विश्राम भवनापर्यंतच्या व्हाइट टॉपिंग कॉंक्रिटीकरणासाठी तब्बल ५ कोटी ४८ लाख ८६ हजार ९६७ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. नागरी दलितेतर वस्ती सुधार योजनेअंतर्गत या कामास सुरुवात करण्यात आली आहे. याशिवाय, श्री सिद्धेश्वर गणपती मंदिर ते संतोषी माता चौकापर्यंतच्या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतून २ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. तसेच साक्री रोडवरील संतोषी माता मंदिर चौक ते सुंदरमाधव हॉस्पिटलपर्यंतच्या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणासाठी राज्य शासनाच्या अर्थसंकल्पातून ५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, पारोळा रोडवरील शेतकरी पुतळा ते दाता सरकार मंगल कार्यालयापर्यंतच्या रस्त्यासाठीही २ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती त्यांनी दिली.

### वाहतूक कोंडीवरही होणार उपाय

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते महात्मा गांधी पुतळ्यापर्यंतच्या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणासाठी अर्थसंकल्पात २५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या मार्गावरील भूमिगत गटारीचे काम पूर्ण झाल्यानंतर पुढील महिन्यात रस्त्याचे काम सुरू होणार असल्याचे आमदार अग्रवाल यांनी सांगितले. शहरातील वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये म्हणून सर्व कामे टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येत आहेत. या विकासकामांमुळे मुख्य बाजारपेठेसह शहरातील विविध भागांतील वाहतूक कोंडीची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

## इंधन बचतीसाठी मंत्री गुलाबराव पाटील मैदानात

### पंतप्रधान मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद; इलेक्ट्रिक कारने केला प्रवास, ताफाही केला कमी

जन सम्राट टाईम्स

**जळगाव |** पेट्रोल-डिझेल बचतीसह पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी पुढाकार घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत मंत्री पाटील यांनी इलेक्ट्रिक वाहनातून प्रवास करत नागरिकांसमोर आदर्श निर्माण केला.

विशेष म्हणजे, त्यांनी आपल्या वाहनांच्या ताफ्यातही कपात केली असून अनावश्यक वाहनांचा वापर टाळण्यावर भर दिला आहे. वाढते इंधन दर, प्रदूषण आणि पर्यावरणीय समतोल लक्षात घेता इलेक्ट्रिक वाहनांचा वापर ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

मंत्री गुलाबराव पाटील यांनी इलेक्ट्रिक कारमधून प्रवास करत



"इंधन बचत हीच राष्ट्रसेवा" हा संदेश जनतेपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या उपक्रमाचे विविध स्तरांतून स्वागत होत असून, सर्वसामान्य नागरिकांनीही पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारावेत, असे आवाहन करण्यात येत आहे.

दरम्यान, केंद्र आणि राज्य शासनाकडून इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत असून, त्यातून इंधनावरील अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. मंत्री पाटील यांच्या या कृतीमुळे पर्यावरण संवर्धन आणि इंधन बचतीबाबत सकारात्मक संदेश समाजात पोहोचत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## जनरलच्या १० ते १५ टक्के लोकांना ५० टक्के आरक्षण?

### हा सामाजिक न्याय आहे का?

जन सम्राट टाईम्स

**बदलापूर :** राज्यातील आरक्षण धोरण आणि खुल्या वर्गासाठी प्रस्तावित आरक्षणाच्या मुद्द्यावरून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आर. के.) चे पदाधिकारी राजाराम खरात यांनी राज्य सरकारवर तीव्र शब्दांत टीका केली आहे. "जनरलच्या १० ते १५ टक्के लोकांना ५० टक्के आरक्षण देणे हा सामाजिक न्याय आहे का?" असा सवाल उपस्थित करत त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर थेट निशाणा साधला.

राजाराम खरात यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, "फडणवीस साहेब, आपण आपल्या समाजाप्रती खूप जागृत आहात, हे स्पष्ट दिसून येते. मंत्रिमंडळातही आपला मोठा प्रभाव असल्यामुळेच खुल्या वर्गासाठी ५० टक्के आरक्षणाचा निर्णय कोणत्याही विरोधाशिवाय पुढे नेला जात आहे," असा आरोप त्यांनी केला. तसेच, आरक्षण व्यवस्थेची दिशा बदलण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करत त्यांनी मागासवर्गीयांच्या हक्कांवर गदा येत असल्याची भावना व्यक्त केली. "आरक्षण असलेल्या वर्गांचे पंख छाटण्याचे काम सुरू आहे," असेही ते म्हणाले. ईडब्ल्यूएस (EWS) आरक्षणाच्या निकषांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना खरात म्हणाले की, "वार्षिक ८ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांना ईडब्ल्यूएस अंतर्गत सवलती दिल्या जातात, मात्र रेशनसारख्या मूलभूत सुविधांसाठी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ६० हजार रुपये ठेवली जाते. ही विसंगती सामान्य नागरिकांना अडचणीत आणणारी आहे." त्यांनी पुढे आरोप केला की, "सरकारचे हे धोरण सामाजिक समतोल बिघडवणारे असून, मागास समाजाच्या प्रश्नांवर आवाज उठवणारे नेतेही आता शांत



असल्याचे दिसत आहे."एससी वर्गीकरणाच्या मुद्द्यावरूनही त्यांनी सरकारवर टीका करत "कटकारस्थान सुरू असल्याचा" आरोप केला.

मागासवर्गीय समाजाच्या अधिकारांबाबत व्यापक चर्चा आणि पारदर्शक धोरण आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. राजाराम खरात यांच्या या वक्तव्यामुळे राज्यातील आरक्षणाच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा राजकीय आणि सामाजिक चर्चांना उधाण येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### ईडब्ल्यूएस निकषांवरही सवाल

ईडब्ल्यूएस (EWS) आरक्षणाच्या निकषांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना खरात म्हणाले की, "वार्षिक ८ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांना ईडब्ल्यूएस अंतर्गत सवलती दिल्या जातात, मूलभूत सुविधांसाठी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ६० हजार रुपये ठेवली जाते. ही विसंगती सामान्य नागरिकांना अडचणीत आणणारी आहे.""वार्षिक ८ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांना ईडब्ल्यूएस अंतर्गत सवलती दिल्या जातात, मात्र रेशनसारख्या मूलभूत सुविधांसाठी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ६० हजार रुपये ठेवली जाते. ही विसंगती सामान्य नागरिकांना अडचणीत आणणारी आहे."

## विहिरीत पडून शेतकरी पिता-पुत्राचा दुर्दैवी मृत्यू!

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी:** धुळे तालुक्यातील आर्वी येथे शेतात काम करत असताना विहिरीत पडून शेतकरी पिता-पुत्राचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. भाऊसाहेब निंबा माळी (वय ४३) आणि योगेश भाऊसाहेब माळी (वय १७) अशी मृत पिता-पुत्रांची नावे आहेत. दोघेही शेतात कामासाठी गेले होते. दुपारच्या सुमारास जेवणाचा डबा घेऊन शेतात गेलेल्या भाऊसाहेब माळी यांच्या पत्नीला पिता-पुत्र दोघेही शेतात दिसून आले नाहीत. त्यामुळे त्यांनी परिसरात शोधाशोध सुरू केली. बराच वेळ शोध घेतल्यानंतर शेतातील विहिरीत दोघांचेही मृतदेह पाण्यावर तरंगताना दिसून आले. हे दृश्य पाहताच नातेवाईकांनी एकच हंबरडा फोडला. घटनेची माहिती गावात वाऱ्यासारखी पसरताच ग्रामस्थांनी विहिरीजवळ



मोठी गर्दी केली. ग्रामस्थांच्या मदतीने दोघांचे मृतदेह विहिरीबाहेर काढण्यात आले. त्यानंतर त्यांना तातडीने भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर दोघांनाही मृत घोषित केले.

गावातील तरुण शेतकरी आणि कुटुंबातील कर्त्या पुरुषांचा एकाच वेळी मृत्यू झाल्याने माळी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेमुळे आर्वी गावात शोकमय वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी तालुका पोलीस स्टेशन येथे आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास तालुका पोलीस करत आहेत.

## गॅस सिलेंडर टंचाईवरून मनसे आक्रमक

### श्रद्धा गॅस एजन्सीविरोधात जोरदार आंदोलन

जन सम्राट टाईम्स

**टिटवाळा प्रतिनिधी:** कल्याण-डोंबिवली परिसरातील घरगुती गॅस ग्राहकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक भूमिका घेत टिटवाळ्यातील श्रद्धा गॅस एजन्सीविरोधात जोरदार आंदोलन केले. गॅस पुरवठा तात्काळ सुरळीत करावा आणि ग्राहकांची होणारी गैरसोय थांबवावी, या मागणीसाठी मनसेच्या वतीने निवेदनही देण्यात आले.

घरगुती गॅस सिलेंडर वितरणात होत असलेला मोठ्या प्रमाणावरील विलंब, घरपोच सेवा नाकारणे, अतिरिक्त शुल्क आकारूनही ग्राहकांना स्वतः गोदामातून सिलेंडर आणण्यास भाग पाडणे, अधिकृत पावती न देणे तसेच ग्राहकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन होत असल्याचा गंभीर आरोप मनसेकडून करण्यात आला आहे. मनसेच्या निवेदनानुसार, शासन आणि तेल कंपन्यांकडून गॅसचा कोणताही तुटवडा नसल्याचे वारंवार



सांगितले जात असतानाही प्रत्यक्षात ग्राहकांना सिलेंडर मिळण्यासाठी तब्बल २० ते २२ दिवस प्रतीक्षा करावी लागत आहे. एवढेच नव्हे तर, सिलेंडर वितरणानंतर पुन्हा ३० दिवस पूर्ण झाल्याशिवाय पुढील बुकिंग करता येणार नसल्याचे ग्राहकांना सांगितले जात असल्याने वर्षभरात मिळणारे हक्काचे १२ सिलेंडर मिळणेही अनेक कुटुंबांसाठी कठीण बनले आहे. या प्रकारामुळे गृहिणींसह सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. घरपोच वितरणासाठी ग्राहकांकडून अतिरिक्त शुल्क आकारले जात असतानाही अनेकांना प्रत्यक्षात घरपोच सेवा मिळत नसल्याचा आरोप मनसेने केला आहे. परिणामी, अनेक ग्राहकांना थेट गोदामात जाऊन सिलेंडर आणावे लागत असून, त्यामुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. या आंदोलनावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष उल्हास दादा भोईर, उपजिल्हाध्यक्ष दिनेश भोय यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभाग अध्यक्ष धनंजय पाटील, विधी व न्याय विभागाचे जयेश खंदारे, ॲड. अविनाश शिळकांदे, महाराष्ट्र नवनिर्माण महापालिका कामगार सेनेचे ॲड. अविनाश शेळकांदे, दिलीप राठोड, विशेष कार्यकारी अधिकारी मिलिंद ठाकरे, गिरीश यशवंतराव, समीर मेस्त्री तसेच मनसेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मनसेच्या वतीने प्रशासनाला इशारा देण्यात आला असून, ग्राहकांच्या समस्या तातडीने न सोडवल्यास भविष्यात अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

### घरपोच सेवा मिळत नसल्याचा आरोप

सिलेंडर वितरणानंतर पुन्हा ३० दिवस पूर्ण झाल्याशिवाय पुढील बुकिंग करता येणार नसल्याचे ग्राहकांना सांगितले जात असल्याने वर्षभरात मिळणारे हक्काचे १२ सिलेंडर मिळणेही अनेक कुटुंबांसाठी कठीण बनले आहे. या प्रकारामुळे गृहिणींसह सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. घरपोच वितरणासाठी ग्राहकांकडून अतिरिक्त शुल्क आकारले जात असतानाही अनेकांना प्रत्यक्षात घरपोच सेवा मिळत नसल्याचा आरोप मनसेने केला आहे.

## जनगणना २०२७ राष्ट्रीय कार्यात नागरिकांनी स्वयंस्फूर्त सहभागी व्हावे

### डिस्ट्रिक्ट आयकॉन मुकुंद गोसावी यांचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** देशातील महत्त्वपूर्ण राष्ट्रीय उपक्रम असलेल्या जनगणना २०२७ मोहिमेला नुकतीच सुरुवात झाली असून, या राष्ट्रीय कार्यात नागरिकांनी "आधी देशासाठी, मग माझ्यासाठी" या भावनेतून स्वयंस्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन मतदान जनजागृती कार्याचे डिस्ट्रिक्ट आयकॉन मुकुंद गोसावी यांनी केले आहे. केंद्र शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या डिजिटल जनगणनेच्या







पहिल्या टप्प्यास १ मेपासून मोठ्या उत्साहात सुरुवात झाली आहे. या उपक्रमांतर्गत नागरिकांसाठी स्वगणनासुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, नागरिकांनी स्वतःच्या मोबाईलद्वारे जनगणनेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही त्यांनी सांगितले. यासाठी नागरिकांनी जनगणना स्वगणना संकेतस्थळ या संकेतस्थळाला भेट देऊन विचारण्यात आलेल्या सोप्या प्रश्नांची माहिती भरावी. या प्रक्रियेसाठी विविध भाषांचे पर्याय उपलब्ध करून देण्यात आल्याने नागरिकांना कोणतीही अडचण येणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ऑनलाइन माहिती भरल्यानंतर नागरिकांना ११ अंकी क्रमांक प्राप्त होणार असून, तो क्रमांक सुरक्षित जतन करून ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे..तसेच जिल्ह्यातील सामाजिक, सेवाभावी संस्था, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीही आपल्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात जनजागृती करून नागरिकांना या राष्ट्रीय कार्यात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन मुक्ती फाउंडेशनतर्फे डिस्ट्रिक्ट आयकॉन मुकुंद गोसावी यांनी केले आहे.

## सीए आगीवाल यांची व्यावसायिक क्षेत्रात दुहेरी मानाच्या पदांवर नियुक्ती

### व्यावसायिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** जळगाव शहरातील युवा चार्टर्ड अकाउंटंट तथा जळगाव आयसीएआय शाखेचे माजी अध्यक्ष सीए हितेश आगीवाल यांची शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रातील दोन महत्त्वाच्या पदांवर नियुक्ती झाल्याने जळगाव जिल्ह्याच्या शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे त्यांची "प्रख्यात विद्वान (वाणिज्य)" म्हणून वैधानिक नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ३४(४)(ई) अंतर्गत ही नियुक्ती अधिकृत अधिसूचनेद्वारे करण्यात आली असून, त्यांचा कार्यकाळ ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत राहणार आहे. या नियुक्तीद्वारे सीए हितेश आगीवाल हे विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत शैक्षणिक आणि व्यावसायिक अनुभवाचा संगम साधत अभ्यासक्रम रचना, कौशल्य विकास, इंटर्नशिप तसेच उद्योगाभिमुख शिक्षण यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांमध्ये योगदान देणार आहेत. आयसीएआयच्या प्रादेशिक समितीवरही नियुक्ती याचबरोबर, भारतीय सनदी लेखाकार संस्थान (ICAI) च्या पश्चिम भारत क्षेत्रीय मंडळामार्फत त्यांची धर्मादाय विश्वस्त संस्था, व्यक्ती संघ (AOP), इतर कृत्रिम व्यक्ती तसेच सहकारी संस्था प्रादेशिक समितीवर वर्ष २०२६-२७ साठी नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ही समिती ट्रस्ट, सहकारी संस्था आणि विविध संस्थात्मक रचनांशी



संबंधित धोरणात्मक व व्यावहारिक विषयांवर काम करते. या माध्यमातून सीए आगीवाल यांना संस्थात्मक व्यवस्थापन आणि आर्थिक धोरण क्षेत्रात कार्य करण्याची महत्त्वपूर्ण संधी मिळणार आहे. शिक्षण आणि उद्योग यांच्यातील दरी कमी करण्याचा प्रयत्न सीए हितेश आगीवाल हे कर सल्ला, लेखापरीक्षण आणि व्यवसाय सल्लागार क्षेत्रात कार्यरत असून, विविध शासकीय आणि व्यावसायिक समित्यांवर त्यांनी यापूर्वीही उल्लेखनीय योगदान दिले आहे. या दुहेरी नियुक्तीबाबत प्रतिक्रिया देताना सीए आगीवाल म्हणाले की, "ही केवळ सन्मानाची बाब नसून मोठी जबाबदारी आहे. शैक्षणिक ज्ञान आणि प्रत्यक्ष व्यवहार यांमधील दरी कमी करत विद्यार्थ्यांना अधिक सक्षम आणि भविष्याभिमुख बनविण्यासाठी माझा सातत्याने प्रयत्न राहील." तसेच, क्षेत्राशी संबंधित कोणत्याही सूचना, मते किंवा अडचणी असल्यास त्या hiteshagiwal30@gmail.com या ई-मेलवर पाठविण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडून अभिनंदन सीए हितेश आगीवाल यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाराष्ट्र राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री आदरणीय गुलाबराव पाटील यांनी त्यांचे विशेष अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या आहेत.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

## ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी चोपडा पोलिसांचा पुढाकार

### हेल्पलाईन, बीट मार्शल भेटी आणि तातडीच्या मदतीबाबत जनजागृती कार्यक्रम

जन सम्राट टाईम्स

**चोपडा | प्रतिनिधी :** चोपडा शहर पोलीस ठाण्याच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम ज्येष्ठ नागरिक संघ, चोपडा येथे पार पडला. कार्यक्रमामध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाने राबविलेल्या विविध उपाययोजना, हेल्पलाईन सेवा तसेच आपत्कालीन परिस्थितीत मिळणाऱ्या तातडीच्या मदतीची माहिती देण्यात आली. यावेळी चोपडा शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ज्येष्ठ नागरिकांना कोणतीही अडचण अथवा तक्रार असल्यास तातडीने डायल 112 या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींचे त्वरित निवारण करण्यासाठी पोलीस ठाण्यात स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आली असून, त्यासाठी स्वतंत्र पथक कार्यरत असल्याची माहिती देण्यात आली. पोलीस प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले की, ज्येष्ठ नागरिकांना चौकशीसाठी पोलीस ठाण्यात बोलाविण्याऐवजी पोलीस कर्मचारी त्यांच्या घरी जाऊन आवश्यक ती मदत करतील.









तसेच चोपडा शहर पोलीस ठाण्याचे बीट मार्शल हे नोंदणीकृत एकटे राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांच्या घरी नियमित भेट देऊन त्यांच्या सुरक्षिततेची खात्री करतील.ज्येष्ठ नागरिकांना अनोळखी व्यक्तींना घरात प्रवेश न देणे, मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवणे कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मदतीसाठी पोलीस अधिकाऱ्यांचे मोबाईल क्रमांकही ज्येष्ठ नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आले.

### पोलीस निरीक्षक यांची कार्यशैली चर्चेत

दरम्यान, तालुका पोलीस निरीक्षक पवन देसले यांनी नुकताच कार्यभार स्वीकारल्यानंतर चोपडा शहर व तालुक्यात शिस्तबद्ध आणि लोकाभिमुख पोलीस प्रशासन उभे करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू केले आहेत. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखत नागरिकांना अधिकाधिक चांगल्या सुविधा पोलिसांमार्फत कशा उपलब्ध करून देता येतील, याकडे ते जातीने लक्ष देत आहेत. यापूर्वी महाराष्ट्रातील विविध ठिकाणी सेवा बजावताना त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला असून, चोपडा शहरातही विविध जनहिताचे उपक्रम राबवून प्रभावी कर्तव्यदक्षतेचे दर्शन घडविले आहे. त्यांच्या पुढाकारामुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक बळकट होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.